# आंबेडकरवादी कथा, कविता आणि कांदबरी

**श्री. कमलाकर प्रकाश रगडे**
संशोधक
(एम.ए; बी.एड, एम.फिल; सेट)

**डॉ. यशवंत सोनुने**
मार्गदर्शक
सहयोगी प्राध्यापक
जे. ई. एस. महाविद्यालय जालना

आंबेडकरी मराठी साहित्य याच आंबेडकर नावाच्या ज्ञानसूर्यापासून एक प्रखर तोजोमय अशी उर्जा घेवून अवतरलेले सर्वसामान्य माणसांचे अस्सल जीवनानुभव घेवून अवतरलेले साहित्य आहे. आंबेडकरवादाचा मुख्य गाभा हा सर्व सामान्य माणूस आहे. माणसा -माणसामध्ये भेदभाव निर्माण करणारी व्यवस्था उलथवून समाजवादी समाजरचने ची निर्मिती करण्यासाठी त्यांनी कार्य केले. समता, स्वातंत्र्य, बंधुता, आणि न्यायावर आधारलेली लोकशाही या देशामध्ये यावी हा खरा त्यांच्या कार्याचा धागा होता. बुद्धीप्रामाण्यवादी असे महात्मा बुद्धांचे विचार या देशाच्या विकासासाठी आणि उत्कर्षासाठी खूप महत्त्वपूर्ण आहेत. असा त्यांचा दृढ निश्चय होता. म्हणून त्यांनी बुध्दधम्म स्वीकारला. भारतीय संविधानाच्या माध्यमातून केवळ लोकांना मोठ मानणारी राज्य व्यवस्था निर्माण झाली.सर्व सामान्यांना शिकण्याचा अधिकार मिळाला.समाजातील सर्व स्तर जागे झाले. १९६० नंतर आंबेडकर नावाच्या समतावादाच्या प्रेरणेने दलित साहित्य प्रवाह दमदारपणे नवीन अनुभवविश्व घेवून अवतरला.

**आंबेडकरवादी मराठी कथा:**

दलित साहित्यामध्ये कवितेच्या तुलनेत कथेचे दालन जरा तोकडेच आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकरानी पेटविलेली मानव मुक्तीची मशाल अधिकच प्रकाशमय झाली. मुक्या संवेदनांना व्यक्त होण्यास वाव मिळाला.दलित कथाकारांमध्ये आण्णा भाऊ साठे, शंकरराव खरात, बाबुराव बागुल यांनी दमदार कथा लिहून दलित कथांचा परिचय मराठी साहित्याला करून दिला. अण्णाभाऊ साठेची कथा ही ग्रामीण भागातील गावकुसा बाहेरील जगाचे दु:ख मांडते. तर बाबुराव बागुल यांच्या कथेतून विद्रोह प्रकट होतो. कथालेखनामध्ये महिला देखील दर्जेदार कथा लिहू लागल्या. यामध्ये उर्मिला पवार, प्रज्ञा दया पवार यांच्या कथामधून स्त्री म्हणून असणाऱ्या संघर्षमय जीवनासह दलित स्त्री म्हणून असणारी घुसमट चित्रीत होते. उर्मिला पवार यांचे 'सहावे बोट' १९८८ आणि 'चौथी भिंत' १९८८ खूप महत्वपूर्ण आहेत. प्रज्ञा पवार यांचा 'अफवा' खरी ठरावी. म्हणून २०१० हा कथासंग्रह स्त्रियांचे प्रश्न प्रखरपणे मांडतो.

बाबुराव बागुल हे दलित कथेतील प्रथितयश मिळवलेले लेखक आहेत. व त्याच बरोबर मराठी कथेच्या दालनाला समृध्द करण्याचे काम त्यांनी केले आहे. प्रकाश खरात, जालंदर सोनुने, प्रकाश मोगले, अनंत राउत, माधव सरकुडे, किशोर घोरपडे, आत्माराम गोडबोले, कुमार अनिल, उत्तम कांबळे, अमिताभ, मधुकर जाधव, गौतमीपुत्र कांबळे, दीपध्वज कासोदे, अशा अनेक लेखकांनी अस्पृश्यता, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, स्वार्थी प्रवृत्तीचे पुढारी, बेघर, भिकारी, अंध, अपंग, वृध्द यांच्या दु:खाना, वेदनांना घेवून ही कथा अवतरते. बाबासाहेबाबद्दल नितांत आदर या लेखकांमध्ये दिसतो. संवेदनशील माणसांना दिला

जाणारा त्रास कष्टकरी, दलित, आदिवासी वस्त्यावरील भुकेचे चित्रण, बकाळपण, अंधश्रद्धा, धर्मांतरा नंतर झालेला बदल असे विविध पडसाद या कथांमध्ये पडलेले दिसते.

**आंबेडकरवादी मराठी कविता**

मराठी साहित्याला एका वेगळ्या भाव विश्वाची जाणीव करून देणारी दलित कविता ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाचा महासुर्याच्या प्रकाश तेजाने निर्माण झालेली आहे. ही कविता माणसाला मोठ मानणारी आणि माणसाचे गीत गाणारी आहे. दलित कवितेचा उदय हा सर्वसाधारणपणे १९६० च्या दरम्यान झालेला असला तरी मराठवाडयातील हरिहरराव सोनुले यांनी १९५० पासून काव्य लिखाणास प्रारंभ केलेला दिसून येतो. त्यांनी कविता संग्रह प्रसिद्ध केलेले नसले तरी अभ्यासकांना त्यांच्या अनेक कविता मिळाल्या ते आपल्या कवितेमध्ये म्हणतात

“ चालताना वाट अशी
सारे घेवून वंचना
हुडकिती नेत्र माझे
तुझ्या पावलांच्या खुणा// ”

डॉ बाबासाहेब आंबेडकरावर त्या काळातील दलितांची नितांत श्रद्धा होती. त्यामुळे बाबासाहेबांनी कोरून ठेवलेल्या पायवाटेवर संपूर्ण दलित कवी निघाल्याचे आपणास दिसून येते. दलित कवितेचा पायाच महामानव तथागत गौतम बुध्द आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर उभारलेला असल्यामुळे माणसाच्या मोठेपणासाठी, मानवतेचे गीत गाण्यासाठी, समानतेची नवी पहाट निर्माण होण्यासाठी ही कविता जन्माला आलेली आहे.

**आंबेडकरवादी कवितेतून व्यक्त होणाऱ्या जीवन जाणीवा**

युगानुयुगांपासून गुलामीचे जीवन वाट्याला आलेल्या दलित कवींनी आपले दु:ख व्यक्त करण्यासाठी काव्याची निवड केली. सामान्य माणसाचे दुख, दारिद्र्य आणि उपेक्षांचे ओझे घेवून वावरणारी माणसे अस्पृश्यांच्या दाहक चटक्यांनी होरपळलेली माणसे, गावकुसाबाहेरच्या एका वेगळ्या जगाची ओळख करून देणारी ही कविता आहे. खूप आवेशाने दलित कवितेत व्यक्त होतांना दिसून येते. दया पवार, केशव मेश्राम, वामन निंबाळकर, अर्जुन डांगळे, प्रल्हाद चेंदवणकर, नामदेव ढसाळ ई कविनी आंबेडकरी विचारातून संस्कारित झाल्याची जाणीव व्यक्त केलेली आहे.

“थोडे राहिलेले पाहिलेले जोखीलेले आहे
माझ्या जगाची एक गंधवेणाही त्यात आहे”

नारायण सुर्वे यांच्या या कवितेत जशी कामगार जगाची गंधवेणा आहे. तशी संपूर्ण दलित कवीची, त्यांच्या जीवनाची एक गंध वेणा घेवून दलित कविता प्रकट होते. नामदेव ढसाळानी ‘गोलपिठा’ या पहिल्या काव्य संग्रहातून एका वेगळ्या अपरिचित जगाची ओळख करून दिली. हे जग रात्रीच्या दिवसाचे, अर्धभुकेली पोट घेवून वावरणारी, दारिद्र्यात खितपत पडणारी, गटारा शेजारी राहणारी, संवेदना लाज जळून गेलेल्या लोकांचे बेकारांचे, भिकारी, आणि खिसेकापू, दादा, भडवे, कुंटणखाणा चालवणारे लोक, चरस, अफुंचे असे एक गोलपिठाचे जग,मराठी वाचकां समोर आले आहे

“ आजही मेणबत्ती सारखी जळतात माणसे चौकाचौकातून

कोरभर भाकरी, पसाभर पाणी यांचा अट्टहास केलाच
तर फिरवला जातो नागर, आजही घरादारावरून "

अशापद्धतीने,कोरभर भाकरीसाठी, लाचार झालेली माणसे, अस्पृश्यतेमुळे पसाभर पाणी सुद्धा नशिबात नसणारी माणसे ढसाळानी वाचकासमोर आणली. खेड्यापाड्यात नरकाच्या कोंडवाडयात जगणारी माणसे आणि त्यांचे जीवन शतकानुशतकांपासून वेगवेगळया जखमा घेवून भळभळत आहेत. अस्पृश्यलोक व नवबौध्द बनल्यानंतर ही त्यांच्या जीवनाला पांढरपेशी लोकांनी समजून घेतलेले नाही. केशव मेश्रामानी 'उत्खनन' या काव्यसंग्रहाच्या माध्यमातून अनिष्ट रूढी, प्रथा, परंपराच्या सह दलितांचे दुख, दैन्य, दारिद्र्ययांची कारणमीमांसा करून नवनिर्माणाची पाऊलवाट शोधलेली आहे. ग्रामीण भागातील अस्पृश्यतेचे दाहक चटके व जातीयतेची उतरंड, जगण्याचे कुठलेही नसलेले साधन व यामुळे अस्पृश्यतेचे दुबळेपण आणि शहरी भागातील झोपडपट्टीतील नंगानाच या जीवघेण्या जगाची करुण कहाणी दलित कवितेमधून येते.

**दलित कवितेतून व्यक्त होणारे दु:ख: :**

दलितांना केवळ आपल्या सेवेसाठी राबविण्यात धन्यता मानणारा प्रस्थापित वर्ग पशूपेक्षाही हीन दर्जाची वागणूक त्यांना देत होता. या संदर्भात वामन निंबाळकर या संस्कृती विषयी आपल्या कवितेतून म्हणतात

" कुठल्यातरी झोपडीत भाकरी तापाने व क्षयाने
येथील प्रत्येक क्षण विव्हळणारा
येथले दिवस असेच उजाडताच मावळतात"

आपल्या दु:खी, कष्टी, अमानवीय जीवनाला कारणीभूत असणाऱ्या व्यवस्थेविरोधात उगारलेला हा आसूड आहे. या माणसाचे माणूसपणा नाकारणाऱ्या संस्कृती विरोधात ते आपल्या कवितेच्या माध्यमातून पेटून उठतात.

मराठी कवितेपेक्षा दलित कवितेचे विश्व वेगळे आहे. या कवितेची भाषा घरगुती जगण्याची भाषा आहे. झोपडपट्टीपासून आजच्या संगणक युगापर्यंत बदलत गेलेली भाषा या कवितांमधून पहावयास मिळते. प्रारंभीच्या कवितेत क्रांतीची भाषा बोलणारे कवी दुसऱ्या पिढीमध्ये स्वकीयांना जागृत करताना दिसतात. म्हणून वेदना विद्रोही आणि नकार या वैशिट्यांना घेवून दलित कविता अभिव्यक्त झालेली आहे. विद्रोह हे खऱ्या अर्थाने दलित कवितेचे प्राणतत्वच आहे. व्यवस्थेच्या मुळावर घाव घालून स्वकीयांना आत्मभान देऊन मानव मुक्तीसाठी झटणारी कविता म्हणून दलित कवितेकडे बघावे लागते.

**दलित कांदबरीतील आंबेडकरी विचार :**

दलित कवितेने मराठी साहित्य ढवळून निघाले मात्र त्या तुलनेमध्ये मराठी दलित कांदबरी तेवढी प्रभावी ठरली नाही. बाबुराव बागुल, केशव मेश्राम, आण्णा भाऊ साठे इत्यादी लेखक अपवाद आहेत. हरिभाऊ पगारे सारख्या लेखकांनी 'युगप्रवर्तक' सारख्या कादंबरीतून डॉ. बाबासाहेब आंबेडकरासारख्या महापुरुषाच्या जीवनाचा वेध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. दलित कांदबरी संदर्भात डॉ. भालचंद्र फडके म्हणतात " दलितांची कांदबरी समृध्द करणारे प्रमुख लेखक म्हणजे आण्णा भाऊ साठे आणि शंकरराव खरात. आण्णाभाऊनी ज्या कांदबऱ्या लिहिल्या त्यात दलित जीवनाचा वेध घेण्याची दृष्टी कमी आहे. ते सामान्यत: लोकप्रिय कांदबरीचा फॉर्म्युला वापरीत आहेत. मात्र काही कादंबऱ्यातून ते दलित माणसांच्या

व्यथांना बोलके करू शकतात. 'फकिरा' ही कांदबरी एका सत्य घटनेच्या आधारे लिहली आहे. असे सांगून ते 'कैफियत' मध्ये लिहतात, मी लिहिताना सदैव सहानुभूतीने लिहण्याचा प्रयत्न करतो, कारण ज्यांच्या विषयी मी लिहितो ती माझी माणसे असतात'

वरील माहितीच्या आधारे आपणास असे म्हणता येईल शंकरराव खरात आणि आण्णा भाऊ साठे यांनी दलित जीवन जाणीवा व्यक्त करणाऱ्या कांदबऱ्या लिहिल्या. मात्र अण्णाभाऊची 'फकीरा' कांदबरी वगळता बाकीच्या कांदबऱ्या या फारश्या दलित जीवनाच्या वेध घेणाऱ्या नाहीत. असे असले तरी त्यांचे योगदान नाकारून चालणार नाही. त्यांनी सर्वप्रथम दलित नायकांच्या जीवनाला वाचका समोर आणले हे काही कमी नाही. ते लोकशाहीर असल्यामुळे थोड्याफार फरकाने त्यांच्या कादंबऱ्या या कलात्मकतेकडे झुकत असल्या तरी त्यांचे दलित कादंबरी संदर्भामध्ये असणारे योगदान महत्वपूर्ण आहे. गोरगरीब लोकांविषयी त्यांना फार सहनुभूती आहे ते जीवन त्यांनी स्वत: अनुभवलेले आहे. 'वैर' ही कादंबरी देखील सामाजिक सलोखा निर्माण व्हावा, अनिष्टप्रथा, चालीरीती दूर व्हाव्यात, वैरभाव संपुष्टात यावा आणि महत्वाचे म्हणजे विषमता नष्ट व्हावी हा उदात्त हेतू समोर ठेवून त्यांनी लिखाण केलेले आहे. यासह चित्रा, डोळे मोडीत राधा चाले, अलगुज, चंदन, रानगंगा, माकडीचा माळ,वारणेच्या खोऱ्यात, आघात अग्निदिव्य, रानबोका, कुरूप, मयुर इत्यादी कादंबरऱ्यानी आण्णा भाऊना लोकप्रियता मिळवून दिलेली आहे.

शंकरराव खरातानी 'हातभट्टी' या कादंबरीतून झोपडपट्टीतील जीवनाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. गिरीजा, सर्जा दादा, नान्या या महत्वाच्या व्यक्तिरेखा या कादंबरीत आहेत. 'मी मुक्त ! मी मुक्त !' या सारखी कादंबरी लिहून खरातांनी अनाथ आश्रमात वाढलेल्या मुलाची जीवन कहाणी मांडली. खेड्यातील गुरुजींचे वास्तव त्यांनी "गावाचा टिनूपाल गुरुजी' या कादंबरीतून मांडले. परंतू त्याकाळातील सर्वच शिक्षक हे कावळे गरुजींसारखे असतात असे नाही.'पारधी' ही फासे पारधी जमातीच्या लोकांच्या जीवनावर आधारित असणारी कादंबरी आहे. एका वेगळया जगाची ओळख करून देण्यासाठी ही कादंबरी महत्त्वपूर्ण ठरते. शंकरराव खरातां बरोबरच केशव मेश्राम यांची 'हकीकत आणि जटायू'या दोन कादंबऱ्या मधून दलितांच्या वाट्याला आलेले उपेक्षित जीवन आलेले आहे. अंधश्रद्धा, भोळसर वृत्तीयांच्या जौखडातून हा समाज मुक्त व्हावा हा दृष्टीकोन मेश्रामांच्या समोर कादंबरी लिहिताना दिसतो.

अशा स्वरूपाने थोडक्यात दलित कादंबरी ही कवितेच्या तुलनेमध्ये फारशी समृद्ध नाही असे दिसून येते. शंकर राव खरात, अण्णाभाऊ साठे आणि केशव मेश्रामानी एका वेगळया जगाची ओळख करून दिली. बाबूराव बागुलां सारख्या लेखकांनी देखील दलित जाणीव ठेवूनच लिखाण केलेले आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१) दलित साहित्य: वेदना आणि विद्रोह - भालचंद्र फडके
२)विद्रोहाचे पाणी पेटले आहे: पानतावणे गंगाधर
३) आधुनिक मराठी वाङमयाचा इतिहास